# शेतकरी व शेती यांना चांगले दिवस यावेत म्हणून सर्व उपाय योजना करू

-

**मंत्री एकनाथराव खडसे**

**नागपुर,दि.8 डिसेंबर:** राज्य शासनाने योजलेल्या विविध उपायांमुळे राज्यातील शेतक-यांचा आत्महत्या कमी होत आहेत.शेती व शेतकरी यांना चांगले दिवस यावेत यासाठी शासन सर्व उपाय योजील।तसेच उपाय योजनांच्या अंमल बजावणीत येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करू, असे आज विधान सभेत कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांनी प्रशोत्तराच्या तासात उत्तर देतांना सांगितले.

शेतक-यांच्या आत्महत्या हे चांगलं लक्षण नाही, असं स्पष्ट करून खडसे उत्तरात पुढं म्हणाले की, शेतक-यांच्या आत्महत्या हां मागील 15 वर्षातील धोरणांचा परिपाक आहे. शेतक-यांच्या मनातील नैराश्य दूर करून त्यांचं मनोबल उंचविण्यासाठी जिल्हा पातळीवर समित्या नेमल्या आहेत.याखेरीज शासनाने जल युक्त शिवार, शेत तळी, यूरिया खताच्या कीमती वाढू न देणं, बी टी कापूस बियाणांच्या दरात पाकिटामागे 100 रुपये कमी करणं, एक लाख हेक्टर क्षेत्रावर 100 टक्के अनुदानाने फळ झाड़ लागवड, दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थांची फी माफ़ी, दोन लाख रूपय्यांच् सौंरक्षण देणारी अपघात विमा, शेती कर्जाच् पुनर्गठन, व्याज माफ़ी, सघन सिंचन, 50 टक्के अनुदानावर दुभत्या जनावरांचं वाटप, शेत तळी इत्यादि अनेक उपाय योजना योजल्या आहेत.त्याच्या परिणामी शेतक-यांच्या आत्महत्या निश्चितपणे कमी होतील, विश्वास खडसे यानी व्यक्त केला.मागील 15 वर्षात मागच्या सरकारने राबविलेली धोरणे अपयशी ठरल्यामुळेच आम्ही सत्तेत आलो आहोत, असे सांगून , शेतक-यांच्या प्रश्नावरील चर्चेत सहभागी व्हा, आम्ही तुमच्या सर्व प्रश्नांचीउत्तरे देण्यास तयार आहोत, असे खडसे शेवटी म्हणाले.

.......